॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**✲ सुविचार ✲**
खर्च करुन आवक शोधण्यापेक्षा
आवक पाहून खर्च करावा.







■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. ६ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक २५ था ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# देशात उद्या ब्लॅकआउट आणि मॉक ड्रिल

## केंद्रीय गृहमंत्रालयाचे सर्व राज्यांना महत्वाचे निर्देश । धोका नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**



जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढंच नाही तर पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल झाल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. यातच आता केंद्रीय गृहमंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना महत्वाचे निर्देश दिले आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. त्यामुळे दिल्लीत हालचाली वाढल्याचं दिसून येत आहे. रविवारी भारताच्या हवाई दल प्रमुखांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताच्या नौदल प्रमुखांनी देखील भेट घेत पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात चर्चा केल्याचं सांगितलं जातं.

दरम्यान, यानंतर आता आजही दिवसभर दिल्लीत बैठकांचा धडाका सुरू असल्याचं पाहायला मिळाल. यातच आता केंद्रीय गृहमंत्रालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने भारतातील सर्व राज्यांना ७ मे रोजी नागरी संरक्षणासाठी 'मॉक ड्रिल' घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### गृहमंत्रालयाने दिले निर्देश

■ भारतातील सर्व राज्यांना नागरी संरक्षणाच्या पार्श्वभूमीवर ७ मे रोजी 'मॉक ड्रिल' घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये या दिवशी सर्व राज्यांत सायरन वाजले जातील. जेव्हा हल्ला होतो, तेव्हा सूचना देण्यासाठी सायरन वाजवले जातात. मात्र, सर्व राज्यातील सुरक्षा यंत्रणा सज्ज आहे की नाही? किंवा सुरक्षा यंत्रणा तपासण्यासाठी या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती सांगितली जात आहे.

### भारत मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत

■ पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिल्लीत नरेंद्र मोदी आणि संरक्षण खात्याचे सचिव राजेश कुमार सिंह यांची महत्त्वाची बैठक पार पडली. मोदी यांच्या सात लोककल्याण मार्ग या निवासस्थानी ही बैठक झाली. दोघांमध्ये जवळपास पाऊण तास या विषयावर चर्चा झाली. या बैठकीपूर्वी पंतप्रधान मोदी नौदल आणि हवाई दलाच्या प्रमुखांना भेटले होते. त्यामुळे ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. मोदी यांनी भारतीय लष्कराला कारवाईची मोकळीक दिली असल्याने येत्या काही दिवसांत एखादी महत्त्वाची घटना घडणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## SPOT NEWS

### १० गावांची 'मधाची गावे' म्हणून होणार ओळख

● **मुंबई** – महाराष्ट्रातील विविध १० जिल्ह्यांतील १० गावांमध्ये 'मधाचे गाव' ही योजना राबविण्याचा निर्णय राज्याच्या उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ३० एप्रिल २०२५ रोजी घेतला आहे.
सदर योजनेद्वारे राज्यात नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेल्या विविध भागांमध्ये मधमाशांच्या संवर्धनातून तसेच मध आणि मधमाशांपासून तयार होणारी उत्पादनाची साखळी, प्रक्रिया व विक्री व्यवस्था करण्यात येईल. या माध्यमातून राज्यात एक प्रकारे मधूपर्यटन होणार आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने या योजनेसाठी राज्यातील दहा गावांच्या नावांचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला होता. या योजनेसाठी राज्य शासनाने ५ कोटी, १ लाख ९७ हजार रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. ज्या गावामध्ये ही योजना यावर्षी राबविण्यात येणार आहे, त्याच गावात सदर योजना पुढच्या वर्षीही राबविण्यात येईल, असे हमीपत्र शासनाकडे सादर करणे हे संबंधित ग्रामपंचायतीला आवश्यक असेल.

### उज्जैनच्या महाकाल मंदिरात भीषण आग

● **उज्जैन** – मध्य प्रदेशातील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग उज्जैन महाकालेश्वर मंदिराच्या गेट क्रमांक १ वर भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या भाविकांमध्ये खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. मंदिर परिसरातील आग विझवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले गेले. सध्या ही आग नियंत्रणात आली असल्याची माहिती समोर येत आहे. या आगीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि एसपी यांनी घटनास्थळी धाव घेतली. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्या या प्रकरणाचा तपास पोलिस करत असून, यानंतरच आगीचे नेमके कारण समोर येईल. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास महाकालेश्वर मंदिराच्या फॅसिलिटी सेंटरवर असलेल्या प्रदूषण मंडळाच्या नियंत्रण कक्षात अचानक आग लागली. या आगीने प्रचंड स्वरूप घेताच परिसरात धुराचे लोट दिसू लागले. यामुळे मंदिर परिसरात खळबळ उडाली. या घटनेची माहिती तातडीने पोलिस आणि अग्निशमन दलाला देण्यात आली.

# जीप - दुचाकीच्या धडकेत आढळगावचे दोघे ठार





● **श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथे श्रीगोंदा - जामखेड महामार्गावर दुचाकी व चारचाकी जीपच्या अपघातात दोघे तरुण जागीच ठार झाले. रविवार दि.४ रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.

रोहित भरत शिंदे (वय २२ वर्ष) व अतुल एकनाथ शिंदे (वय ३० वर्ष) (दोघेही रा. आढळगाव) हे अपघातात जागीच ठार झाले आहेत. अपघातानंतर जीप चालकावर कारवाईसाठी मृतांच्या नातेवाईकांनी आढळगाव येथे काहीकाळ रास्तारोको आंदोलन केले.

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास आढळगाव येथील दोघे दुचाकीवरुन श्रीगोंद्यावरुन आढळगावच्या दिशेने येत होते. आढळगाव परिसरात आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला चारचाकी जिपने मागील बाजुने जोरदार धडक दिली. दोघांच्याही अंगावरून जीप गेल्यामुळे दोघे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर चारचाकी चालकाने पलायन केले. बोलेरो गाडीच्या चालकाने जखमींना उपचारासाठी दवाखान्यात घेऊन जाण्याऐवजी तेथून पलायन केले. अपघाताची माहिती मिळताच आढळगावातील तरुणांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना श्रीगोंद्यातील रुग्णालयात हलविले. त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे रुग्णालयाने जाहिर केले.

### मृतांच्या नातेवाईकांनी केले आंदोलन

■ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांनी वाहन आणि वाहनचालकाला ताब्यात घेण्याची मागणी करत सोमवारी गाव बंद करुन रास्तारोको आंदोलन केले. सुमारे चार तास आंदोलन सुरुच होते. अखेर श्रीगोंदा पोलिसांनी कारवाईचे आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# अहिल्यानगरच्या विकासाच्या वाटचालीसाठी चौंडीतील बैठक महत्वपूर्ण ठरेल : ना. विखे

● **नगर । वीरभूमी–**



चौंडी येथे मंत्रिमंडळाची प्रथमच होत असलेली बैठक जिल्ह्याच्या दृष्टीने ऐतिहासिक क्षण आहे. अहील्यानगरच्या विकासाच्या वाटचालीसाठी बैठक महत्वपूर्ण ठरेल असा विश्वास जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केला.

मंत्री मंडळाच्या बैठकी बरोबरच शहरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाची माहीती देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाचे त्रिशताब्दी वर्ष असून, या वर्षाचे औचित्य साधून मंत्री मंडळाची बैठक श्रीक्षेत्र चौंडी येथे घेण्याचा निर्णय झाला. मंत्री मंडळाच्या बैठकीमुळे जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांबाबत तसेच काही विकासात्मक वाटचालीतील महत्वपूर्ण निर्णय या बैठकीतून होतील अशी अपेक्षा ना.विखे पाटील यांनी बोलून दाखविली.

भारतीय जनता पक्षाच्या अहील्यानगर येथील मध्यवर्ती कार्लालय इमारतीचा भूमीपूजन समारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्यासह सभापती प्रा. राम शिंदे, आ शिवाजीराव कर्डीले, आ. मोनिका राजळे, आ. विक्रमसिंह पाचपुते, प्रदेश पदाधिकारी लक्ष्मण सावजी, प्रदेश महामंत्री विजय चौधरी आदि पक्षाचे पदाधिकारी उपस्थित राहाणार आहेत.

पक्ष कार्यालची भव्य आशी वास्तू शहरात उभारण्यात येत असून, सर्व सुविधांनी परीपूर्ण असे कार्यालय लवकरच तयार होईल. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या संपर्काच्या दृष्टीने तसेच संघटनात्मक कार्यासाठी जिल्हा स्तरावर हे कार्यालय महत्वपूर्ण ठरणार आहे.

महायुती सरकारच्या माध्यमातून शहरातील शासकीय विश्राम गृहाची इमारत पूर्ण झाली आहे. या ईमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री मंडळातील सदस्य उपस्थित राहातील. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९३ व्या जयंती दिना निमित्ताने पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौडेशनच्या विस्तारीत सहाशे विद्यार्थीनी क्षमतेच्या वसतीगृहाच्या इमारीतीचा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परीषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले.

# कुकडी प्रकल्पातून १२ मे ते १५ मे दरम्यान आवर्तन सुटण्याची शक्यता

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**
कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे व खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. यावेळी २२ मे ते १५ मे दरम्यान आवर्तन सोडण्यात येणार असल्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार रोहित पवार, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार माऊली कटके, आमदार नारायण पाटील, शरद सोनवणे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, अधीक्षक अभियंता संतोष सांगळे उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, कुकडी प्रकल्पातून लवकरात लवकर आवर्तन देण्याची कार्यवाही करण्यात यावी. शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. स्थानिक लोकप्रतिनिधीकडून पाणी वितरणाच्या शिफारशी घेण्यात याव्यात. प्रत्येक तालुक्याला समानतेने पाणी वितरीत होईल, यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दीनिमित्त येत्या ३१ मे रोजी चौंडी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मोठ्या संख्येने जनता याठिकाणी उपस्थित राहणार आहे. चौंडीला पुरेश्या प्रमाणात पाणी देण्याचे नियोजन करण्याच्या सुचनाही पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी आवर्तनाच्या अनुषंगाने उपयुक्त अशा सूचना केल्या.

■ कालवा सल्लागार समितीची बैठक मात्र पार पडली पण कोणत्याही तारखेबाबत शिक्कामोर्तब मात्र झाले नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. येणारे आवर्तन फक्त पिण्याच्या पाण्याचे असणार आहे यात तिळमात्र शंका नाही. लाभक्षेत्रात अनेक ठिकाणी शेती पाण्याची दुर्भिक्षता वाढत चालली आहे. प्रकल्पातील पाणी साठ्याचा विचार करता हे आवर्तन फक्त पिण्याच्या पाण्याचे असेल कारण त्यासाठीच कुकडी प्रशासनाने गेल्या महिन्यात कालव्यावर असलेल्या बेकायदेशीर हजारो शेतकऱ्यांच्या पाइपलाइन तोडल्या आहेत.

# SPOT NEWS

## काकडे विद्यालयाच्या कला व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी तालुक्यात प्रथम

**● शेवगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत शहरातील आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयाच्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. यामध्ये कला शाखेची स्नेहल मारकड ८६.६७ टक्के तर वाणिज्य शाखेचा सर्वेश गायकवाड ९३.३३ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम आले आहेत. विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ४८.२४ टक्के, विज्ञान शाखेचा निकाल ९१.८३ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८१.९६ टक्के लागला आहे. कला शाखेमध्ये स्नेहल शिवाजी मारकड ८६.६७ टक्के गुण मिळवून विद्यालयात व तालुक्यात प्रथम आली. प्राजक्ता संतोष घनवट ७८.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर निशिगंधा प्रमोद मगर ७४.१७ टक्के गुण मिळवून तृतीय आले. विज्ञान शाखेत तनिष्का सुभाष खर्चन ७१.५० टक्के गुण मिळवून प्रथम आली तर कृष्णा अशोक तमनर ६९.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर ममता अरूण काळे ६८.५० टक्के गुण मिळवून तृतीय आली. वाणिज्य शाखेत सर्वेश अशोक गायकवाड ९३.३३ टक्के गुण मिळवून विद्यालयात व तालुक्यात प्रथम आला. ज्ञानेश्वरी सचिन गोलांडे ८८ टक्के गुण मिळवून द्वितीय तर परिणीती संदीप चव्हाण ७६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय आली. या गुणवंत विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अ‍ॅड. विद्याधर काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, संस्थेचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. लक्ष्मण बिटाळ, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख प्रा. अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, उपप्राचार्या रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक प्रा. शिवाजी पोटभरे, सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## लग्नाचे आमीष दाखवत महिलेवर अत्याचार

**● नगर । वीरभूमी–**

शादी डॉटकॉम बेवसाईटवरून पीडित महिलेशी संपर्क साधत, तिला लग्नाचे आमिष दाखविले. घर घेण्यासाठी तिच्याकडून एक लाख ८० हजार रुपये घेतले. केडगाव येथे तिच्यावर अत्याचार करून पुन्हा पैशाची मागणी केली. तिने पैसे देण्यास नकार दिला असता आरोपीने अत्याचाराचे व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देत शिवीगाळ करून मारहाण केली. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विनोद लल्लनसिंग रजपूत (रा. एकदंत कॉलनी, सारसनगर) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडित महिलेने पोलिसांत फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले की, पीडित महिला हावडा (पश्चिम बंगाल) येथील आहे. तिच्या पहिल्या लग्नाचा घटस्फोट झाल्याने तिने दुसरे लग्न करण्यासाठी शादी डॉटकॉम या वेबसाईटवर प्रोफाईल अपलोड केली. त्यामुळे विनोद रजपूत याने तिच्याशी संपर्क केला. त्यानेही दुसरे लग्न करायचे आहे, असे सांगितले. तो सतत पीडितेबरोबर फोनवर बोलत असे. त्यानंतर हावडा येथे पीडितेच्या घरी बोलणे झाले. तो नगरमध्ये काम करीत असून पेंटिंगचा व्यवसाय असल्याचे त्याने सांगितले. नवीन घर घेतल्यानंतर लग्न करू, असेही तो म्हणाला. नवीन घरासाठी त्याने एक लाख ८० हजार रुपये घेतले. दरम्यान, रजपूत ५ मार्च २०२५ रोजी हावडा येथे आठ दिवस राहण्यासाठी होता. त्यामुळे त्यांचे चांगलेच प्रेमसंबध जुळले. त्यानंतर १ एप्रिल २०२५ रोजी पीडिता विनोदला भेटण्यासाठी हावडा येथून नगरला आली. केडगाव शास्त्रीनगर येथे भाड्याच्या घरामध्ये राहिली. याच काळात त्याने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा हावडा येथे गेले. विनोद घर घेण्यासाठी पुन्हा पैसे मागू लागला. त्यास नकार दिला असता त्याने अत्याचार केल्याचे व्हीडिओ नातेवाईकांमध्ये व्हायरल करण्याची धमकी दिली. पीडितेने पुन्हा नगरला येऊन त्यास लग्नाबाबत विचारले असता त्याने नकार दिला. उलट पीडितेला शिवीगाळ करून मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# श्रीगोंदा ते टाकळी कडेवळीत रस्त्याची दुरावस्था

## पाइपलाईनच्या नावाखाली शेतकऱ्यांनी तब्बल १८ ठिकाणी रस्ता खोदला

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

सुमारे सात वर्षांपूर्वी पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून बांधलेला श्रीगोंदा ते भिंगाणमार्गे टाकळी कडेवळीत हा रस्ता शेतकऱ्यांनी पाईपलाइन टाकण्यासाठी तब्बल १८ ठिकाणी खोदल्याने खराब झाला आहे. या रस्त्याची दुरावस्था झाल्याने स्थानिक ग्रामस्थ आणि प्रवाशांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, सात वर्षांपूर्वी अनेक दशके डांबरीकरणाची वाट पहायला लावणारा रस्ता म्हणजे श्रीगोंदा ते भिंगाणमार्गे टाकळी कडेवळीत हा रस्ता होय. तत्पूर्वी टाकळी कडेवळीतला जाण्यासाठी मोठा वळसा घालून हिरडगाव मार्गे प्रवाशांना जावे लागत असे. रस्ता नसल्याने श्रीगोंदा शहरानजीक असलेले भिंगाण गाव विकासापासून कोसो दूर होते. मात्र पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत सात वर्षांपूर्वी हा रस्ता बांधण्यात आला होता. या रस्त्यामुळे श्रीगोंदा आणि टाकळी यांच्यातील दळणवळण सुलभ झाले होते. मात्र, शेतीसाठी पाण्याच्या पाइपलाइन टाकण्याच्या नावाखाली काही शेतकऱ्यांनी कुठल्याही शासकीय परवानग्या न घेता ठराविक अंतरागणिक रस्त्याच्या विविध भागात खणून खड्डे पाडले. यामुळे रस्त्याची चाळण झाली असून, प्रवास करणे धोकादायक बनले आहे.

याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले की, पाईपलाइन टाकण्यासाठी रस्ता खोदण्यापूर्वी कोणतीही परवानगी घेण्यात आली नाही. खोदकामानंतर रस्त्याची दुरुस्तीही करण्यात आली नाही. ज्यामुळे खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. विशेषतः पावसाळ्यात हे खड्डे पाण्याने भरून रस्त्याची अवस्था आणखी बिकट होत आहे. हा रस्ता आमच्या गावासाठी जीवनवाहिनी होता. पण आता त्याची अशी अवस्था झाली की, गाड्या चालवणेही कठीण झाले आहे, अशी खंत टाकळी कडेवळीत येथील रहिवासी व सिद्धटेक दर्शनाला जाणाऱ्या प्रवाशांनी व्यक्त केली. दरम्यान, ग्रामस्थांनी दैनिक वीरभूमीशी संपर्क साधून त्यामार्फत प्रशासनाला तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. रस्ता खोदणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि रस्त्याची त्वरित दुरुस्ती व्हावी, अशी मागणी श्रीगोंद्याला शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी, श्रीगोंदा येथे वैद्यकीय, प्रशासकीय कारणांसाठी येणाऱ्या प्रवाशांनी केली आहे. या घटनेमुळे पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या रस्त्यांच्या देखभालीबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जोपर्यंत ठोस उपाययोजना होत नाहीत, तोपर्यंत स्थानिकांना या खराब रस्त्याचा त्रास सहन करावा लागणार आहे.

> सात वर्षांपूर्वी हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर मी या रस्त्याने परत गेलोच नाही व अशा प्रकारे पाइपलाइनसाठी विनापरवाना रस्ता खोदल्याची मला कुठलीही अधिकृत लेखी तक्रार प्राप्त झाली नाही. त्यामुळे या रस्त्याबाबत मी अनभिज्ञ आहे.
>
> **– महेश खंडागळे,** कनिष्ठ अभियंता, पंतप्रधान ग्राम सडक योजना श्रीगोंदा

### नुकसान करणे हा गुन्हा

■ सरकारी डांबरीकरण रस्ता बेकायदेशीरपणे उकरला गेल्यास, ही गंभीर बाब मानली जाते. कारण यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते आणि नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो. भारतात अशा कृतीवर कायदेशीर कारवाईसाठी भारतीय दंड संहिता अंतर्गत कलम ४२५ नुसार सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे किंवा खराब करणे हा गुन्हा आहे.

## अभिनवचे २० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र

**● अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्था संचलित मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलमधील एकूण २० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरले आहेत. अकोले सारख्या दुर्गम, आदिवासी भागातील मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल ही इंग्रजी माध्यमाची शाळा विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देण्याचे काम गेली ३४ वर्षे निरंतर करत आहे. या शाळेतील विद्यार्थी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये नेहमीच सरस ठरले आहेत. त्यात आता प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये वीस विद्यार्थ्यांनी आपली उत्कृष्ट कामगिरी करत ते शिष्यवृत्तीला पात्र ठरले आहेत. इयत्ता पाचवीतील यशस्वी विद्यार्थी चौधरी पाखी, भुसारी ओम, आमले सात्विका, बिबवे समृद्धी, सई ढोकरे, आरव झोळेकर, कानवडे सृष्टी, घोडके श्रद्धा, वाकचौरे वैष्णव, खोकले पार्थ.

इयत्ता आठवीतील यशस्वी विद्यार्थी – खताळ आर्यन, नवले सार्थक, गुंजाळ स्वरूप, देशमुख वैभवी, गावित युवराज, नरके श्रावणी, लहाने गायत्री, वाबळे चिन्मय, जाधव स्नेहा, शिरसाट पलाक्षी.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, संस्थेच्या उपाध्यक्षा तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, संस्थेच्या सहसचिव तथा मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोंसा डी., कोषाध्यक्ष विक्रम नवले, अभिनव प्री स्कूलच्या प्राचार्या राधिका नवले, अभिनव कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या कुसुम वाकचौरे यांनी त्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे पर्यवेक्षक पराग सानप, पर्यवेक्षिका आरती जाधव, शोभा वाकचौरे, नीता घुले, जीवन देशमुख, रूपाली चौधरी, उषा हसे, स्मिता वाळुंज, नूतन पवार व योगिनी सावंत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## १५ दिवसात अवैध दारू न थांबल्यास आंदोलन

### आमदार डॉ. लहामटेंचा इशारा



**● अकोले । वीरभूमी–**

अवैध दारू मिळत असणाऱ्या गावांची यादी देऊनही पोलिस आणि उत्पादनशुल्क विभाग ती दारू थांबवत नसतील तर आणखी १५ दिवस वाट बघून अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मी स्वतः उपोषणा ला बसेल असा निर्वाणीचा इशारा आमदार डॉ. किरण लहामटे यांनी पोलिस व उत्पादन शुल्क विभागाला दिला.

अकोले तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, ग्रामसेवक व दारुबंदी कार्यकर्ते यांच्या संयुक्त बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना जिथे दारू सुरू आहे तेथे काय कारवाई केली? याचा जाब विचारला व संतापून निर्वाणीचा इशारा दिला.

ज्या दारू दुकानातून दारू येते त्या दुकानावर कारवाई का होत नाही? ती कारवाई करून नियम मोडणाऱ्या परवानाधारक दुकानांना सील ठोका, जागा मालकावर गुन्हे दाखल करा आणि ज्या बीट मध्ये दारू सापडेल त्या बीट अंमलदारावर कारवाई झालीच पाहिजे, असे अत्यंत आक्रमक होत त्यांनी आदेश दिले.

यावेळी प्रास्ताविक करताना हेरंब कुलकर्णी यांनी सरपंच व पोलिस पाटील यांनी अवैध धंदे चालवणाऱ्या व्यक्तींशी वाईटपणा घेण्याची तयारी दाखवावी व गावाला संघटित करून याविरुद्ध आक्रमक व्हावे, व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन करावे व गावात ग्रामसुरक्षा दल स्थापन करावे, असे आवाहन केले.

सामाजिक कार्यकर्ते विनय सावंत यांनी तालुक्यातील जनतेच्या सहनशक्तीची परीक्षा बघू नये.. अन्यथा तालुक्यातील जनता अधिकाऱ्यांविरुद्ध रस्त्यावर उतरेल असा इशारा दिला. मच्छिंद्र देशमुख यांनी लहान मुले नशेखोर शीतपेयाला बळी पडतात असे सांगितले.

यावेळी कार्यकर्ते नीलेश तळेकर, पत्रकार हेमंत आवारी, सुरेश नवले व विविध सरपंच, उपसरपंच पोलिस पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पोलिसांना अनेकदा तक्रारी करूनही पोलिस कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करतात, धाडी टाकण्याअगोदर अवैध दारूवाल्यांना फोन करतात. किती वेळा तक्रारी करायच्या अशा संतप्त भावना त्यांनी व्यक्त केल्या.

उत्पादन शुल्क अधिकारी श्री सहस्त्रबुद्धे यांनी झालेल्या कारवायांची माहिती दिली व १५ दिवसात जास्तीत जास्त कारवाया केल्या जातील, असे सांगितले. पण त्यांना संतप्त सरपंच, उपसरपंच व कार्यकर्ते यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. यावेळी अ‍ॅड. वसंतराव मनकर, खंडूबाबा वाकचौरे, अनिल कोळपकर, भाऊसाहेब वाकचौरे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे व गटविकास अधिकारी श्री. माने उपस्थित होते.

# बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल्स येथे प्रगत मल्टिस्पेशॅलिटी सर्जिकल रोबोटिक सिस्टमचे उद्घाटन

## पुण्याच्या पश्चिम विभागातील सर्जिकल एक्सेलेन्स मध्ये नवीन युगाची सुरुवात

**● पुणे । वीरभूमी–**

मल्टिस्पेशॅलिटी सर्जरीजमध्ये दि एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम या अत्याधुनिक अशा पध्दतींची सुरुवात प्रथमच बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये करण्यात आली असून यामुळे रुग्णसेवा विभागात आणखी एक आधुनिक पध्दतीची सुरुवात झाली आहे. या नवीन पध्दतीमुळे हॉस्पिटल कडून आता अगदी अचूक आणि मिनिमली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करता येणार आहेत. यामुळे कार्डिक थोरॅसिस, ऑन्कोलॉजी, युरोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी क्षेत्रात नवीन क्रांती झाली आहे.

मणिपाल हॉस्पिटल बाणेरने आता हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून यामुळे रोबोटिक असिस्टेड सर्जरी मधील नवीन मार्ग खुला झाला आहे. यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची त्यांची वचनबध्दता अधोरेखित होऊन रुग्णांच्या सेवेकरता असलेली रुग्णकेंद्रित सेवा देण्याची वचनबध्दता सुध्दा अधोरेखित झाली आहे.

यावेळी बोलतांना पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलच्या सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि सर्जरीचे विभाग प्रमुख आणि कन्सल्टंट डॉ. अमीत पारसनीस यांनी सांगितले. रोबोटिक असिस्टेड सर्जरीमुळे अनेक लाभ होतात, यांतील महत्त्वाचा लाभ म्हणजे अजोड अचूकता आणि सटीक पणे सर्जरी करता येते. अगदी छोट्या जखमेतून सर्जरी करता येते. यामुळे सर्जन पूर्ण नियंत्रण मिळवून अतिशय नियंत्रितपणे काम करु शकतात, त्यामुळे चांगले निष्कर्ष मिळतात. रोबोच्या आधुनिक ३ डी क्षमतांमुळे परंपरागत लापारोस्कोपीच्या तुलनेत सर्जन अधिक चांगल्या प्रकारे झुम करु शकत असल्याने पेशींची हाताळणी योग्य पध्दतीने करु शकतात. रोबोटिक सिस्टममुळे सर्जनला सुधारीत रिझॉल्युशन मिळते, चांगल्या प्रकारे काम करता येते ज्यामुळे अधिक चांगली सर्जरी होऊन रुग्णाला आराम मिळतो.

या सुरुवाती विषयी बोलतानां पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलचे कन्सल्टंट युरोलॉजी डॉ. आनंद धारसकर यांनी सांगितले, डीप पेल्व्हिक सर्जरीज किंवा इंट्रिकेंट किडनीच्या उपचारांमध्ये जी अचूकता गरजेची असते ती यात प्राप्त होते आणि त्यामुळे रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर कमी त्रास होतो. विशेष करुन अतिशय जटील अशा सर्जरीजमध्ये अगदी अचूकता मिळते, कमी जखम आणि वेगाने बरे होता येत असल्याने चांगले निष्कर्ष प्राप्त होतात. रोबोटिक्समुळे किडनी ट्रान्सप्लान्टेशन मध्ये मोठा लाभ होऊ लागला आहे.




पुण्यातील मणिपाल हॉस्पिटलचे क्लस्टर डायरेक्टर श्री. आनंद मोटे यांनी सांगितले. मणिपाल हॉस्पिटल्समध्ये आमचे प्रमुख लक्ष्य म्हणजे रुग्णांना जगभरांत उपलब्ध असलेले अत्याधुनिक आरोग्य सेवांमधील नाविन्य उपलब्ध करुन देणे. या वचनबध्दतेमुळेच आम्ही एसएसआय मंत्रा रोबोटिक सिस्टम सुरु करु शकलो. या मंचाचे डिझाईन हे सर्जन्सना अधिक नियंत्रण मिळून किमान जटीलतेने काम करणे शक्य होईल. यामधील अर्गोनॉमिक कंट्रोल्स, ३ डी ४ के इमेजिंग आणि जागतिक सुरक्षा पध्दतींमुळे आता सर्जिकल युगात नवीन क्रांती घडणार आहे.

SPOT NEWS

## बारावी बोर्ड परीक्षेत अभिनवची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

● **अकोले । वीरभूमी-**

अभिनव शिक्षण संस्था संचलित मारुतीराव कोते ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अकोले, इयत्ता बारावी विज्ञान चा निकाल ९७.७२% टक्के लागला आहे. विशेष प्राविण्यमध्ये ३ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये १५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी मध्ये ३९ विद्यार्थी आणि २९ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आहेत. एकूण ८८ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थी हे नामांकित योजनेअंतर्गत राजुर या प्रकल्पातील होते. महाविद्यालयातील गुणवंत पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रथम क्रमांक- वाकचौरे जय निलेश ८४.५०%, द्वितीय क्रमांक- धुमाळ प्रांजली केरु ८२.६७%, तृतीय क्रमांक - बेनके सृष्टी पांडुरंग ७८.३३ %, चतुर्थ क्रमांक - बगनर तृप्ती प्रशांत ७३. ६७% आणि पंचम क्रमांक - देशमुख सेजल संदीप ७२.८३%. अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, उपाध्यक्ष डॉ. जयश्री देशमुख, सहसेक्रेटरी तथा प्राचार्य अल्फोन्सा डी, कोषाध्यक्ष विक्रम नवले, विभाग प्रमुख स्मिता पुंड, प्री-स्कूलच्या प्राचार्य राधिका नवले तसेच सर्व विभागाचे प्राचार्य, विभाग प्रमुख यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सर्व प्राध्यापक पुंड एस.बी., गुंजाळ पी.जे., देशमुख स. ए., घोडके वी.वी., देशमुख जे. एस. यांचे मार्गदर्शन लाभले.

## बारावी परीक्षेत अगस्ति महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

● **अकोले । वीरभूमी-**

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले च्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९७.७५% टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९२.९४% तर कला शाखेचा निकाल ७८.१२% निकाल लागला आहे. इ.१२ वीच्या विज्ञान शाखेला एकूण ३१२ पैकी ३०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून सदगीर प्रांजली बाळू ८१.८३% (प्रथम क्रमांक), आभाळे यज्ञा दीपक (७९.१७%) द्वितीय क्रमांक, ओम सयाजी झोळेकर (७५.१७%) तृतीय क्रमांक. वाणिज्य शाखेत १७० पैकी १५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून जाधव दीपाली भाऊसाहेब (८७.८३%) प्रथम क्रमांक, गिर्हे अश्विनी रंगा (८७.५०%) द्वितीय क्रमांक, चौधरी श्रद्धा दशरथ (८६.६७%) तृतीय क्रमांक तर कला शाखेत ३२० पैकी २५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यादव कृष्णामाया बाळासाहेब (९३.००%) प्रथम क्रमांक, नाईकवाडी ज्ञानेश्वरी अरविंद (८३.८३%) द्वितीय क्रमांक, कोंडावळे प्रतीक्षा गोरक्ष (७९.५०%) तृतीय क्रमांक मिळविलेले आहेत. या उत्कृष्ट निकालाबाबत संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी आमदार वैभवराव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, विश्वस्त मधुकरराव सोनवणे, संपतराव वैद्य, सुरेशराव कोते, अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, सर्व कार्यकारिणी सदस्य, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, उपप्राचार्य प्रा. चांगदेव डोंगरे, पर्यवेक्षक प्रा. विवेक वाकचौरे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.

## अश्लील हावभाव करत महिलेचा विनयभंग

● **नगर । वीरभूमी-**

सावेडी परिसरातील पाईपलाईन रोड येथे २ मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास फेरफटका मारणाऱ्या २९ वर्षीय महिलेस एकटक पाहून अश्लील हावभाव करत तिचा विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंद्रजीत थोरात यांच्यावर गुन्हा दाखल; शेतकरी संतप्त

### निळवंडेचे पाणी पेटले । आम्हालाही सहआरोपी करा : शेतकऱ्यांची मागणी



● **संगमनेर । वीरभूमी-**

संगमनेर तालुक्यात निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यातील पाण्याचा वाद चिघळला असून, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप पसरला असून, आम्हालाही सहआरोपी करा अशी मागणी करत त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यात सध्या पाण्याचे आवर्तन सुरू आहे. जलसंपदा विभागाने कालव्यातील अनधिकृत पाईप काढण्यास सुरुवात केली असता, शेतकऱ्यांनी याला तीव्र विरोध केला. इंद्रजीत थोरात यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करत प्रशासनाच्या कारवाईला आव्हान दिले. जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता प्रमोद माने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, नीमगाव पागा ते खळी पिंपरी दरम्यान अनधिकृत पाईप काढताना इंद्रजीत थोरात यांनी अटकाव केला. थोरात यांनी, आमच्या कारखान्याने पाईप टाकले आहेत, ते काढू नका. शेतकऱ्यांच्या जमिनी कालव्यासाठी गेल्या, त्यांना आधी पाणी द्या, असे सांगितले. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम २२१, २२३ आणि महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (१)(ख), ९३(४) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

### शेतकऱ्यांसाठी लढणे गुन्हा आहे का?

■ जलसंपदा विभागाने यापूर्वीही शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. संगमनेर तालुक्याचे ४८ किमी लाभक्षेत्र असताना पाण्याबाबत अपेक्षित हमी दिली जात नाही. दिलेला शब्द पाळला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी लढणे गुन्हा आहे का? आम्ही यापुढेही शेतकऱ्यांसाठी लढत राहू.

**- इंद्रजीत थोरात,** संचालक, संगमनेर कारखाना

### शेतकऱ्यांचा उद्रेक: चोर सोडून संन्याशाला फाशी

■ गुन्हा दाखल झाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. प्रशासन नियोजन देत नाही, हक्काचे पाणी उपसू देत नाही आणि वरून खोटे गुन्हे दाखल करते. हा अन्याय आहे. इंद्रजीत थोरात यांच्यासोबत आम्हालाही सहआरोपी करा, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने योग्य पर्याय काढला नाही तर आंदोलनाशिवाय आमच्याकडेही उपाय नाही.

**- रामेश्वर पानसरे,** जाखुरी

### तोडगा निघाला होता, मग गुन्हा कोणाच्या सांगण्यावरून?

■ काल सायंकाळी प्रशासन, इंद्रजीत थोरात थोरात आणि शेतकऱ्यांमध्ये सामोपचाराने तोडगा निघाला होता. प्रशासनानेही तो मान्य केला होता. मग आता गुन्हा दाखल का झाला? हे संगमनेरला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे. गुन्हे दाखल करायचे असतील तर आमच्यावरही करा!

**- अण्णा राहिंज,** पिंपरणे

### संगमनेरात तणाव वाढण्याची शक्यता

■ या प्रकरणाने संगमनेर तालुक्यातील वातावरण तणावपूर्ण झाले आहे. शेतकऱ्यांचा उद्रेक आणि आंदोलनाची तयारी यामुळे हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि शेतकऱ्यांमधील तणाव कसा निवळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## योगतज्ञ दादाजी वैशंपायन राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

### प. पू. शरदचंद्र प्रतापे, प्रा. मुकुंदनाथ आंधळे यांना अध्यात्मिक तर, डॉ. काळे, डॉ. झिरपे, डॉ. बाहेती यांना सामाजिक कार्यगौरव पुरस्कार











● **शेवगाव । वीरभूमी-**

येथील गुरुदत्त सामाजिक, शैक्षणिक आणि कला व क्रीडा संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी दिले जाणारे राज्यस्तरीय योगतज्ञ प. पू. दादाजी वैशंपायन अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाले असून, पुरस्कार वितरण सोहळा येत्या बुद्ध पौर्णिमेला दादाजींच्या १०६ व्या जयंतीदिनी होणार असल्याची माहिती अध्यक्ष अर्जुनराव फडके व सचिव फुलचंद रोकडे यांनी दिली. सन्मानचिन्ह, गौरवपत्र व प्रत्येकी अकरा हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यंदाच्या अध्यात्मिक पुरस्कारासाठी श्रीक्षेत्र भालोद (गुजरात) येथील श्रीदत्त मंदिराचे महंत प. पू. शरदचंद्र प्रतापे व देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) येथील जगदंबा ट्रस्टचे संस्थापक प. पू. प्रा. मुकुंदनाथ आंधळे यांची तसेच सामाजिक कार्यगौरव पुरस्कारासाठी डॉ. गौतम काळे (कन्सल्टंट न्यूरोलॉजिस्ट, अहिल्यानगर), डॉ. दिनेश झिरपे (कन्सल्टंट लिव्ह ट्रान्सप्लेट, मॅनाक्रियाटोबिलयरी शस्त्रक्रिया, पुणे) व डॉ. अभिजीत बाहेती (कन्सल्टंट हेमेटो ऑन्कोलॉजिस्ट, पुणे) यांची निवड करण्यात आल्याचे श्री. फडके व श्री. रोकडे यांनी सांगितले.

डॉ. काळे नेवासाचे तर, डॉ. झिरपे व डॉ. बाहेती शेवगावचे सुपुत्र आहेत. पुरस्कार वितरण सोहळा बुद्ध पौर्णिमेला दि. १२ मे २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता दत्त देवस्थानच्या दादाजी प्रसादालयात नाशिकचे प. पू. गजानन कस्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली व मुळशी, (जि. पुणे) येथील किमया आश्रमाचे १३३७ वे पिठाधिश प. पू. श्री स्वामी कृष्ण चैतन्य यांच्या हस्ते तसेच सामाजिक कार्य गौरव पुरस्कार वितरण आमदार मोनिका राजळे व माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

## 'शब्दगंध'च्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी पोस्ट कार्ड लेखन स्पर्धा

### गोसावी व फंड यांची माहिती

● **नगर । वीरभूमी-**

शालेय विद्यार्थ्यांना पत्र लेखनाची सवय लागावी यासाठी शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय पत्र (पोस्ट कार्ड) लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती शब्दगंधच्या राज्य कार्यकारिणी सदस्या शर्मिला गोसावी व प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फंड यांनी दिली.

शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत शालेय विद्यार्थ्यांना लेखनाची सवय लागावी, हस्ताक्षर सुधारावे, विसरत चाललेली पोस्ट कार्ड लेखनाची उपजत कला जोपासली जावी यासाठी पोस्ट कार्ड लेखन स्पर्धा घेण्याबाबत निर्णय घेतला. इयत्ता पाचवी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आई, वडील, मामा, मामी, मावशी, काका, काकू, आजी, आजोबा, यापैकी कोणत्याही एका व्यक्तीला पोस्ट कार्डवर सुद्री बाबत पत्र लिहून ते शब्दगंध साहित्यिक परिषद, फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, भिस्तबाग महालाजवळ, तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३ या शब्दगंधच्या पत्त्यावर पोस्टाने पाठवायचे आहे. पोस्टकार्ड पाठवल्यानंतर ९९२१००९७५० या मोबाईल क्रमांकावर मेसेज पाठविण्यात यावा, असे आवाहन राज्य कार्यकारणी सदस्या शर्मिला गोसावी व प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फंड यांनी केले आहे.

# अवतारी संत परंपरेत शंकर महाराज म्हणजे भक्ती व साधनेचा संगम

### माधवबाबा । पाथर्डी येथील मठामध्ये अवतारी संत शंकर महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा



● **पाथर्डी । वीरभूमी-**

सद्गुरु शंकर महाराज यांनी भक्तांच्या कल्याणात व साधकांना मोक्ष ज्ञानाकडे वळवत उपासकांना खरा भक्तिमार्ग शिकवला. समाधी कालावधीनंतरही त्यांच्या अस्तित्वाच्या अनुभूतीने भाविकांना अवतार कार्याचे महत्त्व पटते. ईश्वर मानव कल्याणासाठी प्रसंगानुरूप अवतार घेतात. अशा अवतारी संत परंपरेत शंकर महाराज म्हणजे भक्ती व साधनेचा संगम आहे, असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले.

अवतारी संत शंकर महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त राज्याच्या विविध भागातून मोठ्या संख्येने भक्त मंडळ पाथर्डी मध्ये आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले. वर्धमान रेदासनी व पडधारिया परिवारातर्फे महाप्रसादाची पंगत देण्यात आली. पहाटे मठामध्ये पादुका व मूर्तींचा जलाभिषेक करण्यात येऊन महापूजा झाली. दुपारी सर्व भाविकांच्या उपस्थितीमध्ये महाआरती व वारकरी सांप्रदायाचे ज्येष्ठ उपासक मोहन सुडके महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला.

पिनाकेश्वर मंदिरामध्ये हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पुणे, अहिल्यानगर, संभाजीनगर, बीड, नाशिक आदी भागातून भाविक सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित होते. शंकर महाराजांचे उपासक माधव बाबांना महाराजांचा अवतार मानत असल्याने संत पूजन सोहळा ही संपन्न झाला.

यावेळी माधव बाबा म्हणाले, ईश्वराने प्रत्येक प्राणीमात्राला त्याच्या पूर्व संचितानुसार कर्म करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला आहे. जन्म जन्मांतरीचे सत्कर्म उदयाला आल्यानंतर ईश्वराकडून लोककल्याणाची शक्ती देत संतांना अवतरीत केले जाते. कलियुगामध्ये कधी काय होईल याचा अंदाज कोणीही सांगू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये अवतारी संत, देवाधिदेव महादेव, आदिमाया आदिशक्ती भगवती यांची सेवा सुरक्षा कवचाप्रमाणे आपले रक्षण करणारी ठरणार आहे. सद्य परिस्थितीमध्ये राष्ट्रावरील सर्व प्रकारचे संकटे दूर होऊन राष्ट्रविरोधी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी देशाला संतांनी व देवाने यश, सामर्थ्य व पाठबळ द्यावे. देश संकटात असताना त्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करणं प्रत्येकाचं कर्तव्य आहे. शंकर महाराजांनी अवतार कार्यात भाविक भक्तांच्या अनेक संकटांना नष्ट करत रक्षण केले होते. पुण्यामध्ये तर उपासकांच्या माध्यमातून बुद्धीला न पडणारी परंतु श्रद्धेला सहजपणे मानवणारे लीला कार्य करून दाखवले. कुठलीही अशक्य गोष्ट शक्य करून दाखवण्याची ताकद संतांमध्ये असते. लोककल्याणासाठी संत आपले आयुष्य वेचतात. संतांची कृपा झाली तरच ईश्वराची ओळख होते. अनेक साधकांना शंकर महाराजांनी लोककल्याणा ची शक्ती प्रदान केली. पाथर्डी चा भव्य मठ केवळ त्यांच्या कृपेमुळे स्थापन झाला. या मठामध्ये महाराजांचे अविरत वास्तव्य असते. त्यांनी वापरलेला पलंग येथे असून दृष्टांत दिल्याप्रमाणे काळ्या पाषाणाची आगळीवेगळी मूर्ती राज्यात फक्त पाथर्डीच्या मठात आहे. सन्मार्गाने चाला, व्यसने करू नका, इतराविषयी द्वेष भाव मनात बाळगू नका, ईश्वराने दिलेले आयुष्य त्याच्या मर्जीप्रमाणे जगा. भक्तांच्या जीवनातील सर्व कष्ट दूर करण्यास मी केव्हाही तत्पर आहे, असा त्यांचा संदेश भाविकांची मान उंचावणारा ठरतो, असे माधव बाबा म्हणाले.

मोहन सुडके महाराज म्हणाले, माधव बाबा म्हणजे पाथर्डीच्या कल्याणासाठी येथे कायमस्वरूपी वास्तव्यास आलेले संत असून अनेक साधकांना त्यांनी अनुग्रहीत केले आहे. त्यांच्या ठाई असणारी सुप्त शक्ती म्हणजे शंकर महाराजांचा कृपाप्रसाद असून कुठल्याही प्रकारचे आर्थिक पाठबळ नसताना व कोणालाही देणगी बाबत फारशी माहिती न देताही अगदी सहजपणे मठाचे झालेले बांधकाम हाच मुळी चमत्कार समजला जातो. अंतर्मन जाणणारे माधवबाबा शहरातील साधकांच्या दृष्टीने दीपस्तंभ प्रमाणे काम करतात. अभिष्टचिंतन सोहळ्याचे प्रास्ताविक रामनाथ बंग, स्वागत अजय पडधारिया, गणेश रेदासणी यांनी केले तर नितीन दुधाळ यांनी आभार मानले.

# भारतीय मूल्य व्यवस्थेचा आधार एकात्म मानव दर्शनातून उपयुक्त ठरेल

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हाधिकारी कार्यालयात पंडीत दीनदयाळ उपाध्य एकात्म हिरक महोत्सवाचा शुभारंभ

**● नगर । वीरभूमी–**

पाश्चात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव, नैतिक मूल्यांचे होत असलेले अधपतन आणि कौटूंबिक विघटन यापासून देशाला वाचविण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या भारतीय मूल्य व्यवस्थेचा आधार हा एकात्म मानव दर्शनातून निश्चित उपयुक्त ठरेल, असा विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पंडीत दीनदयाळ उपाध्य एकात्म हिरक महोत्सव जिल्हास्तरीय कार्यक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री श्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एकात्म मानव दर्शन पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा कौशल्य व रोजगार मागदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनिल शिंदे, जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीचे सदस्य रविंद्र मुळे, अभय आगरकर, दिलीप भालसिंग, दिनकर नितीन आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचे मंथन व्हावे, त्यांनी मांडलेला वैचारिक सिद्धांत नव्यापिढीला समजावा या उद्देशाने कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून राज्यस्तरीय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितची स्थापना करण्यात आली असून पंडित दिनदयाळ यांचे कार्य वेगवेगळया उपक्रमातून पुढे नेण्यासाठी यशस्वी प्रयत्न केल्याबद्दल प्रशासनातील अधिकाऱ्यांचे त्यांनी यावेळी अभिनंदनही केले.

अतिशय सामान्य परिस्थितीतून पंडितजींनी आयुष्याची सुरुवात करत साधेपणा, आत्मनिर्भरता आणि कठोर परिश्रमाचे बाळकडू त्यांना मिळाल्याने त्यांनी स्वत:च्या व्यक्तीमत्वाची जडणघडण त्याच दिशेने केली. बालपणातील संघार्षातून संवेदनशिलता आणि सेवाभास त्यांच्यामध्ये रूजला. विचारांच्या आधारावर त्यांनी केलेली कार्यसाधाना जाज्वल्य राष्ट्रभक्तीत त्यांनी रुपांतरित केली असल्याचेही पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताच्या उत्कृर्षाचा नवा इतिहास लिहिला जात आहे. यामागे पंडित दीनदयाळ यांच्या विचारांची प्रेरणा आहे. समाजातील शेवटच्या घटकाचा विकास हा खऱ्या अर्थाने पंडितजींच्या अंत्योदय चळवळीचा मंत्र होता. देशाची सर्व क्षेत्रात होत असलेली प्रगती पहाता आणि विकासाच्या प्रक्रियेत समाजातील शेवटच्या व्यक्तीला वाढत्या सहभागाचे लक्षण हे खऱ्या अर्थाने अंत्योदयाच्या विचारांचे यश असल्याचेही ते म्हणाले.

भारत देशाला जगभरामध्ये श्रेष्ठस्थान प्राप्त होण्यासाठी मानवदर्शन पुस्तक सर्वांना भविष्याचा मार्ग दाखविण्यासाठी निश्चित उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त करत या पुस्तकाच्या एक लक्ष प्रती जिल्हाभरात वितरित करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

# बंधाऱ्यातील गाळ काढल्याने पाणीपातळीत वाढ होईल

## सरपंच सचिन म्हस्के । वरुर येथील बंधारे खोलीकरण कामाचा शुभारंभ

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेतीची सुपीकता वाढावी व सिंचना क्षेत्रामध्ये वाढ व्हावी यासाठी शासनाने गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही योजना सुरु केली आहे. बंधाऱ्यातील गाळ काढून खोलीकरण झाल्यास भूजल पातळीमध्ये वाढ होऊन सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होणार असल्याचे मत सरपंच सचिन म्हस्के यांनी व्यक्त केले.



शेवगाव तालुक्यातील वरुर बुद्रूक येथे आमदार मोनिकाताई राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून व वरुर बुद्रूक ग्रामपंचायतीच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेतून मोरे वस्ती बंधाऱ्यातून गाळ काढून खोलीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपसरपंच आबासाहेब बेडके, मधुकर वावरे, माणिकराव म्हस्के, ज्ञानेश्वर खांबट, शरद पवार, राकेश गरुड, श्रीकांत भुजबळ, गोरख वावरे, बंडू धायतडक, प्रविण म्हस्के, सोमनाथ तेलोरे, गणेश म्हस्के, संजय खांबट, गणेश मोरे, ओमप्रकाश धूत, दादासाहेब शिंदे, अप्पासाहेब म्हस्के, योगेश वावरे, सावळेराम रेवडकर, गणेश रेवडकर, दिनकर म्हस्के, इमाम पठाण, अशोक शिंदे, राम पवार, भागवत पवार, अप्पा वावरे, योगेश मोरे, किरण मोरे, भारत म्हस्के, अविनाश म्हस्के, नाम फाऊंडेशनचे प्रशांत तेलोरे आदी प्रमुख उपस्थित होते.

वरुर गावातील मोरे वस्ती, रेवडकर वस्ती व शेळके वस्ती येथील बंधाऱ्यातील गाळ काढून खोलीकरण करण्याचा प्रस्ताव १६ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग अहिल्यानगर येथे ग्रामपंचायत वरुर बुद्रूक मार्फत प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर वेळोवेळी पाठपुरावा केल्याची दखल घेऊन वरुर येथील मोरे वस्ती व शेळके वस्ती बंधाऱ्यातील गाळ काढून खोलीकरण करण्याचे काम जलसंधारण विभाग मार्फत मंजूर करण्यात आले असून ५ मे २०२५ रोजी महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग अंतर्गत नाम फौंडेशन मार्फत खोलीकरणचे काम सुरू करण्यात आले आहे.

बंधाऱ्यातील गाळ काढून खोलीकरण केल्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. या कामासाठी ग्रामपंचायत वरुर बुद्रूक व वरूर ग्रामस्थ तसेच परिसरातील शेतकऱ्यांकडून जिल्हाधिकारी डॉ. आशिया तसेच जलसंधारण विभागाचे अधिकारी व नाम फौंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत असल्याने नजिकच्या काळात हे काम पूर्ण होवून परिसरात भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे. याबद्दल शेतकरी, ग्रामस्थ यांच्याकडून आभार मानले जात आहे.

# चर्चेतून मार्ग काढा; सर्वांना हक्काचे पाणी मिळेल हा शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करा : ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा सल्ला

**● संगमनेर । वीरभूमी–**

निळवंडे कालव्यातून शेतकऱ्यांना पाणी देण्यासंदर्भात वादाचा कोणताही विषय नाही. लाभक्षेत्रातील प्रत्येक गावाला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे ही पाटबंधारे विभागाची जबाबदारी आहे. त्याबाबतीत वेळापत्रक तयार करणे, ते योग्यरीत्या पाळले जाईल याचा विश्वास लोकांना देणे, ही भूमिका पाटबंधारे विभागाने घ्यायला हवी. हा विषय राहुरी किंवा राहत्याला जाणाऱ्या पाण्याच्या बाबतीत नाही, ज्याचा हक्क आहे त्याला पाणी मिळालेच पाहिजे, यामध्ये पाटबंधारे विभागाचा संवाद कुठेतरी कमी पडतो आहे, म्हणून सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घ्या चर्चेतून मार्ग निघेल असे मत ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब थोरात यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ज्याच्या त्याच्या हक्काचे पाणी ज्याचे त्याला मिळाले पाहिजे याबाबतीत कोणतीही शंका नाही. मात्र याबाबतीत कुठेतरी फसवणूक झाल्याची भावना झाल्यामुळे संगमनेर तालुक्यातील जनतेमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. आपल्याला फसवले जात आहे, ही भावना वाढल्यामुळे शेतकरी पाईप टाकून पाणी घेत आहे. अशावेळी



त्यांच्याशी चर्चा करायला हवी, चर्चा करून हा प्रश्न मिटविला पाहिजे आणि त्यांना विश्वास दिला पाहिजे की तुमच्या हक्काचे पाणी तुम्हाला मिळेल. मात्र असे होताना दिसत नाही, याउलट शेतकऱ्यांचे पाईप फोडले जात आहे. त्यांचे नुकसान केले जात आहे. म्हणून लोकांच्या भावना तीव्र झालेल्या आहे.

बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले, सरळ वागून व सहकार्य करूनही आपल्याला हक्काचे पाणी मिळत नाही, म्हणून जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला व त्यातून त्यांच्या भावना तीव्र झाल्या असे माझे स्पष्ट मत आहे. संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचा झालेला संताप जलसंपदा विभागाने समजून घ्यायला हवा, या अगोदर दोन वेळा प्रशासनाने शेतकऱ्यांना शब्द दिला मात्र त्याचे पालन केले नाही. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील शेतकरी संतप्त झाला आहे. हा वाद राहुरी, राहाता आणि संगमनेर असा नाही, कोणीही त्याला तसे स्वरूप देण्याचा प्रयत्न करू नये. राहुरी तालुक्यातील लोकही आपलेच आहे. त्यांनाही पाणी मिळाले पाहिजे. मात्र त्याच बरोबर, संगमनेर तालुक्यावर ही अन्याय होता कामा नये.

बाळासाहेब थोरात म्हणाले, निळवंडे धरण आणि कालव्यांची निर्मिती करताना त्याच्यामध्ये लाभ क्षेत्रातील सर्व गावांना पाणी मिळेल याचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे पाण्यावर लाभ क्षेत्रातील सर्वांचा अधिकार आहे. प्रशासनाने या संदर्भात गावागावात बैठका घेऊन त्यांना कागदावर नियोजन समजावून सांगणे आवश्यक आहे, असे न करता शेतकऱ्यांनी टाकलेले पाईप फोडणे किंवा पाईप उपसून फेकणे हे चुकीचे आहे. यासंदर्भात जलसंपदा विभागाने चर्चा केली असती तर मार्ग निघू शकला असता. कोणतीही चर्चा न करता जलसंपदा विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी जेव्हा थेट कालव्यांवर जाऊन शेतकऱ्यांनी टाकलेले पाईप उपसून फेकत आहेत किंवा फोडून टाकत आहे, तेव्हा शेतकरी संताप व्यक्त करणे सहाजिक आहे.

# संजीवनी ज्युनिअर कॉलेजची १०० टक्के निकालाची परंपरा कायम



**● कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाने फेब्रवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १२ वीच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले असुन यात संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी ज्युनिअर कॉलेजचा कॉमर्स व सायन्स शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून उकृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. कॉमर्स शाखेत निकिता नानासाहेब खैरनार हिने ९२.८३ टक्के गुण मिळवून प्रथम गुणानुक्रमांकाची मानकरी ठरली. सायन्स शाखेत भक्ती कल्पेश धाडीवाल हिने व समर्थ सुनिल धाडीवाल याने प्रत्येकी ८९ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला.

कॉमर्स शाखेत गौरी संदीप देवकर हिने ९०.६७ टक्के गुण मिळवुन दुसरा क्रमांक पटकाविला तर सुयश अनिल खैरे याने ८९.३३ टक्के मिळविले व तिसऱ्या गुणानुक्रमांकावर मोहर उमटवली. सायन्स शाखेत अश्विनी गोरखनाथ म्हस्के हिने ८७.८३ टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली तर दर्शन प्रविण कापसे याने ८६. ५० टक्के गुण मिळविले आणि तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

कॉमर्स विभागातुन एकुण ६७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९० टक्यांच्या वरती दोन विद्यार्थ्यांनी गुण मिळविले. ८० ते ८९ टक्यांमध्ये २३ व ७० ते ७९ टक्यांमध्ये ३० विद्यार्थी उत्तिर्ण झाले. सायन्स विभागात एकुण ३२० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यात ८० ते ८९ टक्यांमध्ये १८ व ७० ते ७९ टक्यांमध्ये ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच प्राचार्य डॉ. आर. एस. शेंडगे व त्यांच्या सर्व टीमचे अभिनंदन केले आहे.

# बिरोबाच्या यात्रेत पेटलेल्या कठ्याचा थरार

## कौंठवाडी येथे पेटले नवसाचे ७८ कठे

**● अकोले । वीरभूमी–**

गावातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवत आलेल्या बिरोबाच्या काठीचा गाभाऱ्यातील मूर्तीला स्पर्श झाला. घंटानाद झाला अन् नवसाचे कठे पेटवले गेले. कठे पेटताच मोकळ्या जागेत भक्तांचा हाई हाई या चित्कार आणि यानंतर सुरू झाला कठ्चाच्या यात्रेचा थरार. हजारो भाविकांच्या उपस्थितीत कठ्यांतून निधणाऱ्या त्या ज्वाळांनी किर्रर अंधाऱ्या रात्री सभोवतालचा आसमंतही उजाळून निधाला.

राजूर पासून जवळच असलेल्या अकोले तालुक्यातील कौठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत मानाच्या कठें बरोबर तब्बल ७८नवसाचे कठे पेटले. आदिवासी समाज आपली धार्मिकता आणि श्रद्धा जपत गेल्या अनेक वर्षाच्या परंपरेनुसार कौठवाडी येथे अक्षय तृतीयेच्या नंतर येणाऱ्या रविवारी बिरोबाची म्हणजेच कठेची यात्रा भरत असते. अकोले तालुक्यातील कोठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री



हजारी भाविकांच्या उपस्थितीत नवसाचे कठे पेटले.

इतिहास पाहता कठची संख्या आणि उपस्थितांची संख्या यात वाढ होताना दिसून येत आहे. रविवारी रात्री नऊ वाजता यातील पेटवलेला मानाचा कठा उचलला गेला आणि इतर धगधगते कठे हे भका डोक्यावर घेत मंदिराभोवती फेऱ्या मारण्यास सुरुवात झाली. आग ओकणाऱ्या प्रत्येक कठ्या मागे नवस फेडणारी एक व्यक्ती त्यात गोडेतेल ओतत होती. धगधगत्या करुपात औतलेले तेल या भक्तांच्या अंगा खांद्यावरून ओघळत होते, पण श्राध्दपोटी उचललेल्या या काठ्यांतून ओघळणाऱ्या गरम तेलाची इजा आजपर्यंत कोणालाही झाली नसल्याचे गावकरी सांगतात. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भावीकांच्या डोळ्याचे पारणे फेडले बिरोबा ट्रस्ट अध्यक्ष दत्ता भोईर यात्रा समिती, कौठवाडी व साकीरवाडी ग्रामस्थ यांनी यात्रेचे नियोजन केले. तसेच चालू केल्यावर आमदार डॉ.किरण लहामटे यांनीही उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या राजूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक सरोदे मार्गदर्शनाखाली महिला पो. कॉ. वाडेकर पो. कॉ. उषा मुठे, पन्हाळे, कोंडार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. यामुळे ही कठेची यात्रा निर्विघ्नपणे संपन्न झाली.

काठा म्हणजे बुडाच्या बाजूने कापलेली घागर, कापलेला भाग या घागरीत आतील बाजूस उलटा करून ठेवतात, सादडा, और, जांभूळ असा पेटणाऱ्या झाडांची धपलाटे घागरीत उभी भरतात. यात कापूर, कापूस टाकतात. बाहेरच्या बाजूने आशगंध, चंदनाच्या रंगाने छान नक्षी काढतात. रानचाफ्याच्या रंगीत फुलांनी कठा सजवला जातो. सजवलेले हे कठे बिरोबाच्या मंदिरासमोर मांडतात.